दैनिक महाराष्ट्र www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती)




पुणे || वर्ष ६ वे || अंक ५४ || गुरूवार १९ फेब्रुवारी २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## स्मार्ट टीओडी मीटर ग्राहकांना ३ कोटी ४४ लक्ष रूपयांचा लाभ

बारामती परिमंडळ – महावितरणच्या स्मार्ट टीओडी मीटरधारक घरगुती ग्राहकांना सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत वापरलेल्या विजेच्या युनिटसाठी प्रतियुनिट ८० पैसे टीओडी (टाईम ऑफ डे) सवलत दिली जाते आहे. मागील सात महिन्यात बारामती परिमंडळातील ६ लक्ष ३५ हजार ग्राहकांना ४ कोटी ३० लक्ष वीज युनिटसाठी बिलात ३ कोटी ४४ लक्ष रुपयांच्या सवलतीचा लाभ झाला आहे.ङ्ग प्रगत तंत्रज्ञानामुळे मीटरचे रिडिंग स्वयंचलित पध्दतीने होते आहे. परिणामी मानवी हस्तक्षेप टळून ग्राहकांना अचूक व वेळेत बिले मिळत आहेत. ग्राहक मोबाईल ॲपवर वा पोर्टलवर दैंनदिन वीज वापर पाहू शकतात. त्याद्वारे ग्राहकांचे वीज वापरावर थेट नियंत्रण राहिल. महावितरणकडून ग्राहकांना स्मार्ट टीओडी मीटर मोफत बसविण्यात येत आहेत. तरी ग्राहकांनी ते बसवून घ्यावेत, असे महावितरणचे आवाहन आहे.ङ्ग



घरगुती ग्राहकांना १ जुलै २०२५ पासून दिवसाच्या वीज वापरामध्ये प्रतियुनिट ८० पैसे टीओडी सवलत मिळते आहे. मार्च २०२६ पर्यंत ८० पैसे तर पुढील कालावधीसाठी सन २०२६–२७ करिता ८५ पैसे, सन २०२७ ते २०२९ करिता ९० पैसे तर सन २०२९–३० मध्ये १ रुपये प्रतियुनिट सवलत जाहिर करण्यात आली आहे. या सवलतीचा आर्थिक लाभ स्मार्ट टीओडी मीटरधारक ग्राहकांना होत आहे.ङ्ग मागील सात महिन्यात बारामती मंडळातील १ लक्ष ३२ हजार ग्राहकांना ८७ लक्ष २८ हजार वीज युनिटसाठी बिलात ६९ लक्ष ८२ हजार रुपयांची , सातारा मंडळातील २ लक्ष २१ हजार ग्राहकांना १ कोटी ३६ लक्ष वीज युनिटसाठी बिलात १ कोटी ९ लक्ष रुपयांची, सोलापूर मंडळातील २ लक्ष ८१ हजार ग्राहकांना २ कोटी ७ लक्ष वीज युनिटसाठी बिलात १ कोटी ६५ लक्ष रुपयांची टीओडी सवलत मिळाली आहे.

## ‘एआय’मुळे शेती क्षेत्रात मोठे बदल; महाराष्ट्राच्या निवासी आयुक्त आर. विमला यांची माहिती

नवी दिल्ली : कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता वेगाने परिवर्तन घडवत असून, शेतकऱ्यांच्या दैनंदिन निर्णयांपासून उत्पादनवाढीपर्यंत ठोस परिणाम दिसून येत आहेत, असे महाराष्ट्राच्या निवासी आयुक्त आर. विमला यांनी मंगळवारी सांगितले.येथे आयोजित जागतिक ‘एआय’ परिषदेत २६ नाविन्यपूर्ण अभ्यासांचा संग्रह प्रकाशित करताना त्या बोलत होत्या.



काश्मीरमध्ये गायींसाठी वापरल्या जाणाऱ्या ‘स्मार्ट नेकलेस’द्वारे आजाराची लक्षणे दिसण्याच्या काही दिवस आधीच संसर्ग ओळखला जातो, तर उपग्रहांच्या मदतीने ऊसातील साखरेचे प्रमाण ९५ टक्क्यांपर्यंत अचूकतेने भाकीत केले जाते, अशी उदाहरणे देत विमला म्हणाल्या की एआयमुळे लाखो लघु व सीमांत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळत आहे.महाराष्ट्राच्या कृषी विभागाने मे २०२५ मध्ये विकसित केलेल्या ‘महाविस्तार–एआय’ या संवादात्मक प्लॅटफॉर्मद्वारे आतापर्यंत २२ लाख शेतकऱ्यांना वैयक्तिक पीक सल्ले देण्यात आले आहेत. ‘हे केवळ बदल नाही, तर मोठ्या प्रमाणावर झालेले रूपांतर आहे,’ असे विमला यांनी ‘एआय केसबुक ऑन जेंडर अँड ॲग्रीकल्चर’च्या प्रकाशनावेळी नमूद केले.माती परीक्षणाबाबत ‘वसुधा’ आणि ‘निओ पार्क’ कार्यक्रमांतर्गत वापरल्या जाणाऱ्या पोर्टेबल उपकरणांमध्ये हायपरस्पेक्ट्रल इमेजिंग तंत्रज्ञानाचा वापर करून जागेवरच मातीचा संपूर्ण रासायनिक प्रोफाइल ९० टक्क्यांहून अधिक अचूकतेने मिळत आहे. त्यामुळे आठवड्यांची प्रयोगशाळा प्रतीक्षा टळत असून, उपग्रह डेटासोबत एकत्रित वापरामुळे शेतकऱ्यांना २० ते ३२ टक्क्यांपर्यंत उत्पादनवाढ अनुभवायला मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

या संग्रहात ‘मॅपक्रॉप’ कंपनीने सुपर–रेझोल्यूशन उपग्रह प्रतिमांच्या आधारे उसातील सुक्रोज पातळी ९५ टक्के अचूकतेने भाकीत केल्याची नोंद आहे. यामुळे ५७ टक्क्यांपर्यंत उत्पादनवाढ साध्य झाली आहे. हाच उपग्रह पायाभूत ढाचा शेतकऱ्यांचे क्रेडिट स्कोअर तयार करण्यासाठी वापरला जात आहे.

### ‘एआय’ प्रत्येक शेतकऱ्यासाठी

‘एआय ही केवळ काही मोजक्या लोकांसाठी नसून, ग्लोबल साऊथमधील प्रत्येक कोपऱ्यातील शेतकऱ्यासाठी आहे. शेतीचे भविष्य केवळ १० अब्ज लोकांना अन्न देण्यापुरते मर्यादित नाही; ते न्याय्य, शाश्वत आणि सन्मानाने करण्याबाबत आहे, असे विमला यांनी सांगितले.

## भारतात कधी परतेन सांगू शकत नाही विजय मल्याचा उच्च न्यायालयात दावा

मुंबई : आपण भारतात कधी परत येऊ हे सांगू शकत नाही, असे फरारी आर्थिक गुन्हेगार (एफईओ) आणि मद्यसम्राट विजय मल्या याच्यातर्फे गुरुवारी उच्च न्यायालयात सांगण्यात आले.



भारतात येऊन कायद्याच्या वैधतेला आव्हान देणारे प्रकरण चालवावे, असे नमूद करून भारतात येणार की नाही हे स्पष्ट करण्यासाठी न्यायालयाने मल्या याला मागील सुनावणीच्या वेळी शेवटची संधी दिली होती. त्या पार्श्वभूमीवर मल्या याच्या याचिकेवर गुरुवारी सुनावणी झाली. त्यावेळी, इंग्लंड आणि वेल्स सोडण्याची किंवा तसा प्रयत्न करण्याची अथवा कोणत्याही आंतरराष्ट्रीय प्रवास दस्तऐवजासाठी अर्ज करण्याची आपल्याला परवानगी नाही, ते स्वत:कडे ठेवण्याची आपल्याला परवानगी नाही. त्यामुळे, भारतात कधी परत येऊ हे स्पष्टपणे सांगू शकत नाहीत, असे मल्या याच्यातर्फे न्यायालयाला सांगण्यात आले.

दरम्यान, मल्या हा त्याच्याविरोधात सुरू केलेल्या कारवाईपासून पळ काढून दिलासा मागू शकत नाही, असेही मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालीला खंडपीठाने मल्या याला उपरोक्त भूमिका स्पष्ट करण्याचा इशारा देताना स्पष्ट केले होते. मल्या हा परत येण्यास इच्छुक नाही असे प्रतिज्ञापत्राद्वारे स्पष्ट करू शकतो. परंतु, त्यला फरारी आर्थिक गुन्हेगार कायद्याला आव्हान द्यायचे असल्यास भारतीय न्यायक्षेत्रात यावेच लागेल, असेही न्यायालयाने मल्याला भारतात परत येणार की नाही याबाबत भूमिका स्पष्ट करण्याची शेवटची संधी देताना स्पष्ट केले.

## मेंदूतील विद्युत हालचाली टिपणारे ‘मानस–१’ मॉडेल; ‘न्यूरो डीक्स.एआय’ कंपनीकडून विकासित

नवी दिल्ली : डीप–टेक क्षेत्रातील ‘न्यूरो डीक्स.एआय’ कंपनीने मानवी मेंदूतील विद्युत हालचाली उलगडून दाखवणारे ४०० दशलक्ष पॅरामीटर्सचे एआय ‘ब्रेन लँग्वेज मॉडेल’ विकसित केल्याची माहिती मंगळवारी दिली. ‘मानस–१’ असे या मॉडेलचे नाव असून, मेंदूविकारांच्या निदान पद्धतींमध्ये विशेषतः न्यूरोसायन्स क्षेत्रात–मूलभूत बदल घडवण्याची क्षमता त्यात आहे.



कंपनीचे संस्थापक सिद्धार्थ पनवार यांनी सांगितले की, या मॉडेलच्या मदतीने मेंदूविकारांचे लवकर निदान व अधिक अचूक उपचार शक्य होतील. ‘मानस–१’चे मूल्यमापन व प्रमाणीकरण करण्यासाठी ते सरकारकडे सादर करण्यात आले असून, सार्वभौम कृत्रिम बुद्धिमत्ता साधनांसाठी उदयास येणाऱ्या मानकांनुसार त्याची पडताळणी केली जाणार आहे.

सरकारी मान्यता मिळाल्यानंतर निधीही उपलब्ध होणार असून, त्यातून उत्पादनाचा पुढील विकास साधता येईल, असे पनवार यांनी स्पष्ट केले. येत्या काही महिन्यांत या मॉडेलचे पॅरामीटर्स वाढवून ते २ अब्जांपर्यंत नेण्याचा कंपनीचा मानस आहे.

‘मानस–१’च्या सहाय्याने मिरगी (एपिलेप्सी) तसेच मानसिक आरोग्यविकारांशी संबंधित बायोमार्कर्स ओळखण्यात अचूकता साध्य झाल्याचेही त्यांनी नमूद केले. मानवी जैविक संकेतांचे अर्थ लावून प्रगत आरोग्य व न्यूरोलॉजिकल आकलन देऊ शकणारे, भारतातील पहिले फाऊंडेशन– स्केल फिजिओलॉजिकल स्टेट मॉडेल विकसित करण्याच्या व्यापक संशोधन प्रयत्नांचा हा भाग असल्याचे त्यांनी सांगितले. एआय क्षेत्रात प्रचंड संधी उपलब्ध आहेत. आमचे उत्पादन सर्वोच्च मानकांशी सुसंगत ठरेल.

## शेअर बाजारात सलग तिसऱ्या दिवशी तेजी, सेन्सेक्स २८३ अंकांनी वधारला, गुंतवणूकदारांची १.८ लाख कोटींची कमाई

मुंबई: भारतीय शेअर बाजारात सलग तिसऱ्या दिवशी तेजी पाहायला मिळाली. बाजार बंद झाला तेव्हा सेन्सेक्स २८३.२९ अंकांच्या तेजीसह ८३७३४.२५ अंकांवर होता. दुसरीकडे निफ्टी ९३.९५ अंकांच्या तेजीसह २५८१९.३५ वर बंद झाला. सुरुवातीच्या काळात बाजारात विक्रीचं सत्र पाहायला मिळाल्यानं निफ्टीमधील घसरण २५६४५.१५ अंकांपर्यंत पोहोचली होती. मात्र, दुपारी शेअर बाजारात पुन्हा खरेदी सुरु झाल्यानं सेन्सेक्स आणि निफ्टी तेजीसह बंद झाले.




भारतीय शेअर बाजारात लार्ज कॅप शेअरच्या तुलनेत मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअरन चांगली कामगिरी केली. निफ्टी मिडकॅप आणि निफ्टी स्मॉलकॅप निर्देशांकात ०.५ टक्क्यांची वाढ झाली आहे. आयटी निर्देशांक वगळता इतर सेक्टोरल निर्देशांक तेजीत बंद झाले. मेटल, एफएमसीजी आणि पीएसयू बँक निर्देशांकात १ टक्क्यांची तेजी दिसून आली. प्रायव्हेट बँक,रिअल्टी, ऑटो आणि ऑईल अँड गॅस क्षेत्रात ०.५ टक्क्यांची वाढ झाली. निफ्टी आयटी निर्देशांकात १.२ टक्क्यांची तेजी दिसून आली. गुंतवणूकदारांची १.७८ लाख कोटींची कमाई बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य ४७१.८९ लाख कोटींवर पोहोचलं आहे. मंगळवारी बीएसईचं बाजारमूल्य ४७०.११ लाख कोटी होतं. बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य १.७८ लाख कोटी रुपयांनी वाढलं आहे. म्हणजेच गुंतवणूकदारांच्या संपत्तीत १.७८ लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

बीएसईवरील टॉप ३० शेअर पैकी १८ कंपन्यांच्या शेअरमध्ये तेजी दिसून आली आहे. टाटा स्टीलच्या शेअरमध्ये सर्वाधिक तेजी पाहायला मिळाली. आयटीसी, एक्सिस बँक, रिलायन्स इंडस्ट्रीज, महिंद्रा अँड महिंद्राच्या शेअरमध्ये १.१८ टक्क्यांची तेजी दिसून आली. तर, सेन्सेक्सवर टेक महिंद्रा, इटरनल, इन्फोसिस, अदानी पोर्टस आणि एचसीएल टेकच्या शेअरमध्ये घसरण पाहायला मिळाली आहे.

बीएसईवर लिस्ट असलेल्या ४३८३ शेअरमध्ये आज ट्रेडिंग झालं. २२४३ शेअरमध्ये तेजी दिसून आली तर १९५२ शेअरमध्ये घसरण झाली. १८८ शेअरमध्ये तेजी किंवा घसरण झालेली नाही. ११२ शेअरनं ५२ आठवड्यांचा उच्चांक गाठला. १०० शेअरनं ५२ आठवड्यांचा निचांक गाठला. (टीप– शेअर बाजार, म्यूच्यूअल फंड हे जोखमीच्या अधीन असतात. या लेखात दिलेली माहिती ही प्राथमिक स्वरुपाची असून आम्ही कोणताही दावा करत नाही. या लेखामागचा गुंतवणुकीसाठी शिफारस, सल्ला देण्याचा उद्देश नाही. तुम्हाला गुंतवणूक करायची असेल तर या क्षेत्रातील तज्ज्ञांचा सल्ला घ्या.)

## आयटीआयच्या दोन लाख विद्यार्थ्यांना मिळणार आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

मुंबई: कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून राज्यातील दोन लाख आयटीआयच्या विद्यार्थ्यांना टप्याटप्याने आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण मिळणार आहे. आपत्ती व्यवस्थापनाचा दीर्घ अनुभव असलेल्या ‘अनिरुद्धाज्? अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट’ आणि कौशल्य विभागांतर्गत व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालय यांच्यात आज यासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला आहे.



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सशक्त भारत घडवण्यासाठी देशवासियांसाठी विविध उपक्रम यशस्वीपणे राबवत आहेत. योग दिन, खेलो इंडिया याचाच हा भाग आहे. तर राज्यातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात कौशल्य विभागाकडून ही पारंपरिक खेळांचे महत्व नव्या पिढीला पटवून देण्यासाठी राज्यभरातील आयटीआयमध्ये क्रीडा महाकुंभ ही आयोजित करण्यात येतो. आता याच शृंखलेत जनसेवेच्या भावनेतून आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम राबवून देशसेवेचे काम आयटीआय मध्ये होत असल्याचे प्रतिपादन कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी यावेळी केले.कोणतीही आपत्ती ही सांगून येत नसते, आपत्ती मानव निर्मित असो किंवा नैसर्गिक असो, अशा वेळी मानवी सुरक्षेला प्राधान्य देऊन यामध्ये युवांचा सहभाग वाढवून जिल्हा आपत्ती व्यवस्थापनला सहकार्य होण्यासाठी आपत्ती बचावकार्य करणारी यंत्रणा तयार करता येईल. आपत्तीचे व्यवस्थापन आणि बचावकार्य याचे प्रशिक्षण प्रत्येक नागरिकांनी घेतले पाहिजे,असेही मंत्री लोढा यांनी सांगितले.

‘अनिरुद्धाज्? अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट’ राज्यातील ४१९ शासकीय आयटीआयमध्ये विद्यार्थ्यांना विना शुल्क प्रात्यक्षिकांसह आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणार असल्याचे अकादमीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील मंत्री यांनी यावेळी सांगितले. मानवाने प्रगती केली असली तरी, आपत्तीचे स्वरूप ही त्यानुसार बदलले असून आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण नव्या पिढीला देण्याचा आमचा उद्देश असल्याचे व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालिका श्रीमती माधवी सरदेशमुख यांनी यावेळी सांगितले. तर शहरी आणि ग्रामीण भागातील विविध आपत्तीचा अभ्यास करून अकादमीने हा प्रशिक्षण कार्यक्रम तयार केला आहे. आपत्तीतील उपाययोजना आणि बचाव कार्य याचे प्रामुख्याने प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात येणार असल्याची माहिती अकादमीचे प्रतिनिधी हरीश महाजन यांनी दिली. यावेळी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनायाचे सह संचालक सतीश सूर्यवंशी उपस्थित होते.

संपादकीय

## संवाद

अमेरिकन प्रशासनाच्या अंदाजानुसार बांगलादेशमधील 'जमात-ए-इस्लामी' हा इस्लामिक पक्ष पुढील महिन्याच्या निवडणुकीत आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी करू शकेल आणि म्हणूनच अमेरिका त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत आहे. बांगलादेशमध्ये 'जमात-ए-इस्लामी' या संघटनेवर यापूर्वी अनेक वेळा बंदी घालण्यात आली होती. अलीकडेच शेख हसीना यांची राजवट आरक्षण आंदोलनाला लागलेल्या हिंसक वळणामुळे उलथवून टाकण्यात आली. तिथे युनूस मोहम्मद यांचे हंगामी सरकार सत्तेवर आहे. या सत्तेच्या काळात 'जमात-ए-इस्लामी'ला अधिक महत्त्व मिळत गेले. हसीना यांच्या सरकारकडे युनूस हेही शत्रूपक्षाचे सरकार म्हणून पाहत होते. हे सरकार उलथवून टाकण्यात 'जमात-ए-इस्लामी'ची भूमिका महत्त्वाची होती. त्यामुळे युनूस याच पक्षाच्या सल्ल्याने कारभार करतात आणि धोरणे ठरवतात. हाच पक्ष सत्तेवर यावा, असे त्यांना वाटते. 'जमात-ए-इस्लामी' पक्षाने पारंपरिकपणे शरिया कायद्यावर आधारित शासन आणि महिलांचे कामाचे तास कमी करण्याचा पुरस्कार केला आहे; जेणेकरून त्या मुलांप्रती त्यांची कर्तव्ये पार पाडू शकतील. तथापि, अलीकडेच त्यांनी आपली सार्वजनिक प्रतिमा सौम्य करण्याचा आणि महिलांचा पाठिंबा वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. 'जमात-ए-इस्लामी'चे प्रवक्ते मोहम्मद रहमान म्हणाले, की पक्ष भ्रष्टाचारविरोधी, पारदर्शकता, जबाबदारी आणि सुशासन या मुद्द्यावर निवडणुका लढवत आहे. महिलांसाठी कामाचे तास कमी करण्याचा प्रस्ताव प्राथमिक टप्प्यात आहे आणि पक्षाची शरिया कायदा लागू करण्याची कोणतीही योजना नाही.

१९७१ मध्ये बांगलादेश मुक्ती युद्धादरम्यान, 'जमात-ए-इस्लामी'च्या अनेक नेत्यांनी लोकांवर गंभीर अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला होता. पक्षाने वेगळ्या बांगलादेशला विरोध केला होता, कारण तो इस्लामविरोधी असल्याचे मानले जात होते. भारतात बाबरी मशीद पाडल्यानंतर, जमात नेते आणि विद्यार्थी संघटनांवर बांगलादेशमध्ये हिंदूविरोधी दंगली भडकवल्याचा आरोपही करण्यात आला होता. बांगलादेशमधील राजकीय परिस्थिती बदलत असताना तेथील अमेरिकन राजदूतांनी पुनरुज्जीवित इस्लामिक चळवळीसोबत काम करण्याची तयारी दर्शवली. 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या अहवालानुसार अमेरिकेचा अंदाज आहे, की 'जमात-ए-इस्लामी' बांगलादेशच्या निवडणुकीमध्ये ऐतिहासिक यश मिळवू शकते. 'वॉशिंग्टन पोस्ट'ने मिळवलेल्या ऑडिओ रेकॉर्डिंगनुसार १ डिसेंबर रोजी बांगलादेशी महिला पत्रकारांसोबत बंद दाराआड झालेल्या बैठकीत ढाका येथे तैनात असलेल्या एका अमेरिकन राजदूताने सांगितले, की देश इस्लामिक झाला आणि १२ फेब्रुवारीच्या निवडणुकीमध्ये 'जमात-ए-इस्लामी' पूर्वीपेक्षा चांगले प्रदर्शन करेल. 'वॉशिंग्टन पोस्ट' या वृत्तपत्रानुसार 'जमात-ए-इस्लामी' बांगलादेशवर इस्लामिक कायद्याची आपली धारणा लादण्याचा प्रयत्न करेल, या चिंतेकडे अमेरिकन राजदूताने दुर्लक्ष केले. ते म्हणाले, की जमात शरिया लादू शकते, असे मला वाटत नाही. पक्षाच्या नेत्यांनी अशी भयानक पावले उचलल्यास अमेरिका दुसऱ्याच दिवशी त्यांच्यावर शंभर टक्के कर लादेल.

'द वॉशिंग्टन पोस्ट'ला दिलेल्या निवेदनामध्ये ढाका येथील अमेरिकन दूतावासाच्या प्रवक्त्या मोनिका शिया म्हणाल्या, की डिसेंबरमध्ये झालेली चर्चा ही एक नियमित बैठक होती. ही अमेरिकन दूतावासाच्या अधिकाऱ्यांची आणि स्थानिक पत्रकारांमधील 'ऑफ-द-रेकॉर्ड' चर्चा होती. त्या म्हणाल्या, की बैठकीदरम्यान अनेक राजकीय पक्षांबाबत चर्चा झाली. अमेरिका कोणत्याही एका राजकीय पक्षाला दुसऱ्यापेक्षा जास्त पसंती देत नाही आणि बांगलादेशमधील लोक निवडत असलेल्या सरकारसोबत काम करण्याची अमेरिकन सरकारची योजना आहे.

तथापि, 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या अहवालात बांगलादेशमधील अमेरिकन राजदूत एका महत्त्वपूर्ण संक्रमणादरम्यान देशाच्या राजकीय भविष्याकडे कसे पाहतात, यावर प्रकाश टाकला आहे. ढाका येथील दूतावासाच्या बैठकीत, एका अमेरिकन अधिकाऱ्याने सूचित केले, की 'जमात-ए-इस्लामी'शी संपर्क साधण्याव्यतिरिक्त मिशनचे कर्मचारी 'हेफाजत-ए-इस्लाम बांगलादेश' आणि 'इस्लामी आंदोलन बांगलादेश'सह इतर रूढीवादी गटांसोबतही काम करत आहेत. ते इस्लामिक राजकीय पक्षांमध्येही सामील होऊ शकतात. राजनयिकाने जोर देऊन सांगितले, की 'जमात-ए-इस्लामी' सत्तेत आली आणि अमेरिकेला मान्य नसलेली धोरणे लागू केली,

# 'टिटवाळ्यातील गणेश मंदिर रोडवर नियंत्रण सुटलेल्या ट्रकचा थरार ;अनेक वाहनांना चिरडले ...घटनेमागे ट्रकचा ब्रेक फेल की चालक दारूच्या नशेत ?






टिटवाळा,(प्रतिनिधी ): टिटवाळा पूर्वेकडील असलेल्या मुख्य गणेश मंदिर रोडवर सकाळी ११ च्या सुमारास प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार,बनेलीकडुन टिटवाळा पुर्वेकडुन स्टेशनच्या दिशेने येत असलेला एक ट्रेलर ट्रक हा अचानक वेगाने येत रिक्षा स्टँड जवळ असलेल्या गणेश मंदिर या मुख्य रस्त्यावरील बिकानेर या मिठाई शॉपसमोर आल्यानंतर वाहनावरील नियंत्रण सुटलेल्या या चालकाने काही सेकंदांतच समोर येणाऱ्या तसेच पार्क केलेल्या अनेक वाहनांना धडक देत मोठ्या प्रमाणात नुकसान केले. तर हा ट्रक इथेच न थांबता पुढे गणेश मंदिराच्या दिशेने पुन्हा वेगाने जात पटेल मार्टच्या जवळ एका डीवायडरला येऊन आदळला आणि थांबला .या अपघातात अनेक वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून काही वाहनचालक देखील यात जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली असली तरी हा अपघात अत्यंत गंभीर स्वरूपाचा ठरला आहे. ङ्ग एका मोठ्या मालवाहू ट्रकने नियंत्रण सुटल्याने रस्त्यावर उभ्या असलेल्या आणि जाणाऱ्या अनेक वाहनांना जोरदार धडक दिली. बेदरकार वेगात आलेल्या या ट्रकने काही दुचाकी, चारचाकी आणि इतर वाहनांना उडवत थेट गणेश मंदिर रोडवरील पटेल मार्ट परिसरात येऊन थांबला. या ट्रकचा क्रमांक -१९ ४६७० असा असून अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली.ङ्गया घटनेमागे ट्रकचा ब्रेक फेल झाला होता की चालक दारूच्या नशेत होता, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती मिळालेली नाही. पोलीस यंत्रणा या दोन्ही शक्यतांची चौकशी करत असून चालकाची वैद्यकीय तपासणी करून मद्यप्राशनाची खातरजमा केली जाणार आहे. तसेच ट्रकची तांत्रिक तपासणी करून ब्रेक प्रणालीमध्ये बिघाड होता का, याचाही सखोल तपास केला जाणार आहे. वैद्यकिय तपासणीसाठी वाहचालकाला शासकिय रुग्णालयातङ्गघटनेची माहिती मिळताच कल्याण तालुका पोलिस स्टेशन टिटवाळा येथील पोलीस स्थानकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंकज गिरी आपल्या कर्मचाऱ्यांसह तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी वाहनचालकाला ताब्यात घेत परिसरातील गर्दी नियंत्रित करत वाहतूक सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना केल्या. नुकसानग्रस्त वाहनांची नोंद घेण्याची प्रक्रिया सुरू असून संबंधित वाहनमालकांकडून तक्रारी स्वीकारल्या जात आहेत.ङ्गया अपघातामुळे गणेश मंदिर रोडवरील वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली होती. स्थानिक नागरिकांनी ट्रक चालकाविरोधात कडक कारवाईची मागणी केली असून, जड वाहनांच्या वेगावर आणि चालकांच्या तपासणीवर कठोर नियंत्रण ठेवण्याची गरज व्यक्त केली आहे. वारंवार अशा अपघातांच्या घटना घडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.ङ्गपोलिसांकडून पुढील तपास सुरू असून चालकाविरोधात योग्य कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. या घटनेने शहरातील वाहतूक सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणला आहे. तर या परिसरात कायम स्वरूपी वाहतूक बीट तातडीने करण्यात यावी ही मागणी आता जोर धरत आहे .

# अचूक निदान आणि अत्याधुनिक उपचाराने कर्करोग रुग्णाला मिळू शकते जीवदान

मुंबई:कर्करोग हा देशातील प्रमुख आरोग्य समस्यांपैकी एक आहे. बदलती जीवनशैली, तंबाखूजन्य पदार्थांचा वाढता वापर, आहाराच्या चुकीच्या सवयी, ताणतणाव, पर्यावरणीय घटक आणि वेळोवेळी आरोग्य तपासणी करण्यास टाळाटाळ करणे हे कर्करोगास कारणीभूत असे प्रमुख घटक आहेत. स्तन, फुफ्फुस, गॅस्ट्रोइंटेस्टाइनल, हेड ॲण्ड नेक आणि प्रोस्टेट कॅन्सर यासारख्या सामान्य कर्करोगांचे निदान वाढत्या प्रमाणात होत आहे. उशिरा निदान झाल्यास अवयवांचे नुकसान, मेटास्टेसिस आणि जगण्याचा दर कमी होणे यासारख्या गुंतागुंत होऊ शकतात, ज्यामुळे वेळीच उपचार करणे अत्यंत गरजेचे आहे.असे मत झायनोवा शाल्बी रुग्णालयाचे कर्करोग तज्ञ डॉ.दीपक खन्ना यांनी व्यक्त केले.ङ्ग देशात सध्या कॅन्सरच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. कॅन्सरची वाढती रुग्णसंख्या पाहता झायनोवा शाल्बी हॉस्पिटल्समध्ये कर्करोगाने पिडीत रुग्णांवर उपचारांसाठ ऑन्कोलॉजी विभागास सुरूवात केली आहे. या नव्याने सुरु झालेल्या ऑन्कोलॉजी विभागात कर्करोग तपासणी, प्रगत इमेजिंग तंत्रज्ञानाचा वापर, बायोप्सी सुविधा, केमोथेरपी, इम्युनोथेरपी आणि टार्गेटेड थेरपीसह एंड-टू-एंड ऑन्कोलॉजी सेवा पुरविली जाणार आहे.ङ्गया विभागात वरिष्ठ सल्लागार हेड ॲण्ड नेक ऑन्को-सर्जन डॉ. दीपक खन्ना, हेड ॲण्ड नेक ऑन्को-सर्जन डॉ. जेरुशा फर्नांडिस, वरिष्ठ स्त्रीरोग ऑन्को-सर्जन आणि रोबोटिक सर्जन डॉ. प्रशांत न्याती, वरिष्ठ सल्लागार थोरॅसिक सर्जन आणि सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. प्रिया एशपुनियानी, स्तन कर्करोग आणि पुनर्रचना शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. संदीप बिप्टे आणि गॅस्ट्रोइंटेस्टाइनल हेपेटोपॅंक्रिटोबिलरी सर्जन डॉ. प्रसाद पांडे आणि वैद्यकीय ऑन्कोलॉजिस्ट डॉ. दीप व्होरा कार्यरत आहेत.ङ्गङ्गमुंबईतील झायनोव्हा शाल्बी हॉस्पिटलचे हेड ॲण्ड नेक ऑन्को-सर्जन डॉ. दीपक खन्ना म्हणाले,आमचा ऑन्कोलॉजी विभाग हा आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वेळीच निदान आणि उपचार पुरविण्यास सक्षम आहे. वेळीच निदान आणि योग्य उपचारांमुळे भविष्यातील गुंतागुंत टाळता येते आणि कर्करोगावर मात करणे शक्य होते. आम्ही विलंब न करता अचुक तपासणी, कर्करोगाचा टप्पा आणि त्यानुसार कर्करोगावरील उपचार पध्दत सुनिश्चित करण्यावर विशेष भर देतो. केवळ वैद्यकीय व्यवस्थापनच नाही तर, उपचारापासून ते रुग्ण बरा होईपर्यंतचा प्रवास तसेच रुग्णाच्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्यास त्याला वेळोवेळी मार्गदर्शन करणे आणि आजाराच्या प्रत्येक टप्प्यावर रुग्णाला विशेष आधार देणे हे आमचे ध्येय आहे.




# विंगमॅनएक्स अवॉर्ड्स ने भारताच्या रायडिंग समुदायाचा आणि त्याला एकत्र जोडून ठेवणाऱ्या व्यक्तींचा केला सन्मान

पुणे, : विंगमॅनएक्स अवॉर्ड्स २०२५२६ चा पहिला सोहळा हयात हॉटेल, पुणे येथे यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमात जबाबदारी, नेतृत्व आणि अर्थपूर्ण योगदानाद्वारे भारताच्या मोटरसायकलिंग संस्कृतीला आकार देणाऱ्या व्यक्ती आणि समुदायांचा गौरव करण्यात आला.ङ्ग ङ्गदेशभरातील रायडर्स, समुदाय नेते आणि मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत आयोजित हा सोहळा रायडर-नेतृत्वातील आणि तळागाळातील योगदानकर्त्यांसाठी समर्पित भारतातील पहिल्या मोठ्या सन्मान मंचांपैकी एक ठरला. अभिनेता आणि सूत्रसंचालक अमन यतन वर्मा यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. ङ्ग ङ्गविंगमॅनएक्सचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश साने यांनी या उपक्रमामागील दृष्टीकोन स्पष्ट करताना सांगितले, ''रायडर्सना अर्थपूर्ण पद्धतीने एकत्र जोडणे आणि जबाबदारीने रायड करण्यासाठी प्रेरित करणे, या उद्देशाने हे व्यासपीठ उभारण्यात आले. विश्वासावर आधारित योग्य रायडिंग साथीदार शोधण्याच्या साध्या कल्पनेतून सुरू झालेला हा प्रवास आज राष्ट्रीय स्तरावरील रायडर इकोसिस्टम बनला आहे, जिथे ओळख, विश्वास आणि प्रतिष्ठेला महत्त्व आहे. हे पुरस्कार सातत्याने उच्च मानके प्रस्थापित करणाऱ्या रायडर्स आणि समुदायांचा सन्मान करतात.''ङ्ग ङ्ग२०२४ मध्ये सुरू झाल्यापासून विंगमॅनएक्सने ८०,००० पेक्षा अधिक ॲप डाउनलोड्स आणि ६०० हून अधिक रायडिंग क्लब्स जोडत विश्वासार्ह डिजिटल व्यासपीठ म्हणून आपली ओळख अधिक मजबूत केली आहे.

सह-संस्थापक डॉ. साहिल त्रिंबके यांनी रायडिंग संस्कृती घडवण्यात समुदायाच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले. ''मजबूत गट चांगल्या सवयी निर्माण करतात, सुरक्षिततेला प्राधान्य देतात आणि रायडर्समध्ये जबाबदारीची भावना वाढवतात. हे पुरस्कार या सामूहिक जबाबदारीचा उत्सव आहेत,'' असे ते म्हणाले.ङ्ग ङ्गपारदर्शकता आणि विश्वासार्हता सुनिश्चित करण्यासाठी पुरस्कारांचे मूल्यांकन एका सुसूत्र पद्धतीद्वारे करण्यात आले. प्रथम नामांकनांची छाननी निवड समितीने केली, त्यानंतर सार्वजनिक मतदान आणि स्वतंत्र परीक्षक मंडळाकडून मूल्यमापन झाले.

अंतिम विजेते ५०:५० गुणांकन पद्धतीद्वारे ठरवण्यात आले, ज्यात समुदाय सहभाग आणि तज्ज्ञ मूल्यांकन यांना समान महत्त्व देण्यात आले.ङ्गङ्गहा पुरस्कार सोहळा प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. अनिल वालिव - बोरिवली प्रादेशिक परिवहन कार्यालय,

मुंबई यांचे प्रमुख आणि भारतीय लष्कराचे माजी अधिकारी कर्नल अरुण दत्ताजी पाटोले (निवृत्त) यांच्या उपस्थितीत पार पडला. यासोबतच मोटरसायकलिंग समुदायातील मान्यवर नेत्यांची परीक्षक समितीही उपस्थित होती.

# घटस्फोट प्रकरणी व्हॉटस्ॲप चॅट्स आणि कॉल रेकॉर्डिंग वापरास परवानगी

रायपूर : पत्नीला स्वत:ची माहिती गुप्त ठेवण्याचा अधिकार नक्कीच आहे; पण हा अधिकार इतका मोठा नसावा की, दुस-या पक्षाला (उदा. पती किंवा पत्नीलाा) आपला खटला सिद्ध करण्यासाठी पुरावे सादर करता येणार नाहीत. योग्य न्याय तेव्हाच होतो जेव्हा दोन्ही बाजूंना आपले म्हणणे सिद्ध करण्यासाठी आवश्यक ते पुरावे मांडण्याची पूर्ण संधी मिळते, असे स्पष्ट करत छत्तीसगड उच्च न्यायालयाने नुकताच घटस्फोटाच्या प्रकरणात पतीने सादर केलेल्या कॉल रेकॉर्डिंग आणि व्हॉट्सॲप चॅट्सना पुरावा म्हणून परवानगी देण्याचा कौटुंबिक न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला आहे.

बार अँड बेंचच्या रिपोर्टनुसार, पतीने सादर केलेल्या कॉल रेकॉर्डिंग आणि व्हॉट्सॲप चॅट्सना पुरावा म्हणून परवानगी देण्याचा निर्णय कौटुंबिक न्यायालयाने घेतला होता. मात्र या निर्णयाला पत्नीने उच्च न्यायालयात याचिका दाखल करत आव्हान दिले होते. तिने आपल्या याचिकेत म्हटले होते की, पतीने आपला मोबाईल फोन हॅक करून त्यातील माहिती (पुरावे) गोळा केली आहे. पतीने असे करणे हे तिच्या खासगीपणाच्या अधिकाराचे उल्लंघन असल्याचा दावाही पत्नीने केला होता.

कलम १४ चा अर्थ

या याचिकेवरील सुनावणीवेळी न्यायमूर्ती सचिन सिंह राजपूत यांनी स्पष्ट केले की कौटुंबिक न्यायालयात पुराव्यांचे नियम थोडे वेगळे असतात. कौटुंबिक न्यायालय कायद्याच्या कलम १४ नुसार, वादाचा निकाल लावण्यासाठी आवश्यक वाटल्यास न्यायालय कोणत्याही पुराव्याचा विचार करू शकते, मग तो पुरावा सामान्य कायद्यात बसत असला किंवा नसला तरीही. त्यामुळेच जर एखाद्याने माझ्या खासगी गोष्टी उघड होत आहेत असा आक्षेप घेतला आणि त्या कारणावरून न्यायालयाने पुरावे नाकारले, तर या कलमाचा काहीच उपयोग राहणार नाही.




खासगीपणाचा अधिकार अमर्याद नाही

गोपनीयता हा शेवटचा शब्द नाही: जरी खासगीपणाचा अधिकार हा प्रत्येकाचा मूलभूत अधिकार असला, तरी तो अमर्याद नाही. मर्यादा आणि अटी: परिस्थितीनुसार या अधिकारावर काही निर्बंध किंवा मर्यादा येऊ शकतात. काही विशिष्ट परिस्थितीत (जसे की सत्य शोधण्यासाठी किंवा न्याय मिळवण्यासाठी) या अधिकारात हस्तक्षेप केला जाऊ शकतो, असेही न्यायमूर्ती सचिन सिंह राजपूत यांनी नमूद केले. तसेच कौटुंबिक प्रकरणांमध्ये पती-पत्नीच्या खासगी आयुष्यातील गोष्टीच पुराव्याच्या स्वरूपात समोर येतात. जर गोपनीयतेच्या कारणास्तव हे पुरावे नाकारले, तर कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्याचा मूळ उद्देशच संपून जाईल असे नमूद करत पत्नीने दाखल केलेली याचिका फेटाळली.

## पंचक्रोशीतील आंबा बागायतदारांना निमंत्रण

बाणकोट पंचक्रोशीतील आंबा बागायतदाराने बागायती मध्ये सुमारे ८ ते ९ वेळा फवारणी करून लाखो रुपये खर्च केले, तरी देखील करपा रोग, वांज मोहर इत्यादी रोगाने ९०% बागायती नष्ट झाल्या आहेत. त्यामुळे बागायतदार कर्जबाजारी झाले असून त्यांच्यावर अक्षरशः उपासमारीची वेळ आली आहे. सबब तमाम बागायतदार चिंतेत आहेत. बागायतदारांना नुकसान भरपाई मिळणे करिता ही बाब शासनाच्या निदर्शनास आणणे अत्यंत गरजेचे आहे . या करिता ग्राम पंचायत बाणकोट येथे रविवार दिनांक २२/०२/२६ रोजी ठिक १०.३० वाजता वार्ताहर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी कृपया आपण आपल्या विभागातील सर्व बागायतदारा सहीत वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती .


## मद्यपी विमान कर्मचा-यांना आता निलंबनाऐवजी समुपदेशन

मुंबई : नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) विमान कर्मचा-यांसाठी श्वास विश्लेषक तपासणीबाबत नागरी विमान वाहतूक नियम शिथिल केले आहेत. पहिल्या प्रकरणात रक्तातील अल्कोहोलचे प्रमाण ०.००९% पर्यंत असलेल्या आढळल्यास संबंधित कर्मचा-याचे समुपदेशन करण्यात येणार आहे. पूर्वी अशा कर्मचा-याला तीन महिने निलंबनाची तरतूद नियमात होती. मात्र वारंवार अल्कोहोलचे सेवन करणा-या कर्मचा-यांवर निलंबनाची कडक कारवाई करण्यात येणार आहे.डीजीसीएने फ्लाइट क्रूसाठी सुधारित ब्रेथ ॲनालायझर नियमावली लागू केली आहे. ज्यामध्ये रक्तातील अल्कोहोल पातळीपर्यंत (०.००९ ग्रम/१०० मिली) आढळल्यास, पहिल्यांदा निलंबनाऐवजी समुपदेशन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. या नवीन नियमांतर्गत व्हिडिओ रेकॉर्डिंग अनिवार्य आहे. वारंवार मद्य सेवन करणा-यास कडक शिक्षा (निलंबन/परवाना रद्द) करण्यात येणार आहे. पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी आणि गैरप्रकार टाळण्यासाठी सर्व ब्रेथ ॲनालायझर चाचण्यांचे व्हीडीओ रेकॉर्डिंग करणे बंधनकारक आहे. दुस-यांदा मद्यप्राशन चाचणी सकारात्मक आल्यास, परवाना तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात येईल. विदेशी पायलट आणि इतर परदेशी पायलटची मद्यप्राशन चाचणी सकारात्मक आढळल्यास त्यांची अधिकृतता रद्द केली जाईल. तसेच, गैर-अनुसूचित ऑपरेटर आणि उड्डाण प्रशिक्षण संस्थांनाही हे नियम लागू आहेत. उड्डाणापूर्वी १२ तास मद्यपान न करण्याचा मूळ नियम कायम आहे. उड्डाणानंतरच्या चाचणीत सकारात्मक आढळल्यास एका वर्षासाठी परवाना निलंबित केला जाईल. ही सुधारणा ९ फेब्रुवारी २०२६ पासून लागू झाली आहे. नवीन नियमांमुळे उड्डाण सुरक्षा वाढवणे आणि कठोर नियमांमधून विमान कर्मचा-यांना दिलासा देण्याचा डीजीसीएचा प्रयत्न आहे.

## श्री विठ्ठल रुक्मिणी प्राणप्रतिष्ठा सोहळा

सुधागड पाली /राम तुपे

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर प्राणप्रतिष्ठा व उद्घाटन महोत्सव सोहळा शुक्रवार ता २० रोजी गोमाशी हद्दीत नांदगाव कोशिबळे मार्गावरील श्री आनंद आश्रम फाऊंडेशन येथे होणार आहे.या महोत्सवानिमित्त शुक्रवारी ता. २० रोजी पहाटेपासून वैदिकविधी,अभिषेक, विठ्ठल रुक्मिणी प्राणप्रतिष्ठा,रांगोळी प्रदर्शन शनिवार ता.२१महापूजा,भजन,किर्तन,महाप्रसाद,चित्रकला प्रदर्शन रविवार ता. २२ होळी उत्सव या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रांगोळी आणि चित्रकला स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र,स्मृती चिन्ह,रोख रक्कम देऊन गौरविण्यात येणार आहे.या कार्यक्रमासाठी गुप्ता,मराठे,भिलारे परिवाराच्या वतीने सर्व भाविकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून दर्शनाचा आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा ही विनंती करण्यात येत आहे.





# लोकजागर

१ लोकसेवार्थ

देशसेवा फाउंडेशनचा गरजूंना आधार

कोरोना काळात आपण अनेक वाईट प्रसंगांचा सामना केला, अनेक कठीण अनुभव घेतले. पण, याच काळात काही चांगल्या गोष्टींची सुरुवात देखील झाली. कोरोना काळात स्थापन झालेलं देशसेवा फाउंडेशन हे त्यापैकीच एक आहे. या संस्थेने स्थापनेपासून आजपर्यंत असंख्य गरजूंना मदतीचा हात दिला आहे. गरीब, वंचित किंवा कोणत्याही प्रकारच्या मदतीची गरज असलेल्या व्यक्तीला ही संस्था निस्वार्थपणे मदत करते.




देशसेवा फाउंडेशनने आजवर १००० हून अधिक गरजूंना रेशन किट्स वितरित केल्या आहेत. लॉकडाऊनपासून सुरू झालेल्या या उपक्रमाचा अनेक एकल कुटुंब, कामगार, वृद्ध आणि विधवा महिलांना लाभ झाला आहे. याशिवाय, आषाढी एकादशीनिमित्त १०० तुळशीच्या रोपांचे वाटप, महिलांसाठी दर महिन्याला सॅनिटरी नॅपकिन्सचे वाटप, वृद्धांसाठी च्यवनप्राश आणि लहान मुलांसाठी ओडोमॉस बँड वाटप, असे विविध उपक्रम या संस्थेकडून राबवले जात आहेत.देशसेवा फाउंडेशन केवळ अन्न, वस्त्र किंवा औषधपुरतं मर्यादित नसून, गरजूंना प्रशासकीय स्तरावरही मदत करते. वृद्धांना पेन्शन मिळवण्यासाठी मार्गदर्शन करणे, फॉर्म भरून देणे, बँकेतील अडचणी सोडवणे, अशा कामांमध्येही संस्था पुढाकार घेते.संस्थेचे संस्थापक आणि अध्यक्ष नरेंद्र पारखे यांनी सांगितलं की, ते कोणत्याही राजकीय पक्षाशी जोडलेले नाहीत. मात्र, समाजातील वेदना पाहून त्यांचं मन हेलावलं. त्यामुळेच त्यांनी देशसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून गरजूंची सेवा सुरू केली. ही केवळ मदत नसून माणुसकी जिवंत ठेवण्यासाठी केलेला प्रयत्न आहे.संस्थेच्या पारदर्शक कार्यपद्धतीमुळे अनेक नागरिक स्वतःहून संपर्क करून मदत मागतात. अनेकजण आर्थिक मदत देखील करतात. कारण, या संस्थेला मिळालेलं दान योग्य वेळी गरजूंपर्यंत पोहचवलं जातं, याची लोकांना खात्री वाटते.एकूणच देशसेवा फौंडेशन चे हे गरीबंसाठीचे समाजकार्य नक्कीच कौतुकास्पद आणि आदर्शवर्त असेच आहे.

२ शून्यातून विश्व

जनसामान्यांच्या गृहस्वप्नांची पूर्ती करणारा उद्योजक

काहीजण शून्यातून विश्व निर्माण करतात, असे आपण नेहमी वाचतो, पाहतो. पण, शून्याच्या खाली म्हणजे अक्षरशः हाती काहीच नसताना केवळ आपल्या जिद्दीच्या, कर्तृत्वाच्या, दूरदृष्टीच्या आणि अफाट मेहनतीच्या जोरावर प्रचंड मोठे विश्व उभे करणारी व्यक्तीदेखील असते, हे एका अतिसामान्य परिस्थितीमधून वर येऊन, आपले प्रचंड साम्राज्य उभे करून, एका ध्येयवेड्या युवकाने दाखवून दिलेले आहे. या कर्तृत्ववान व्यक्तीचे नाव आहे सचिन रघुनाथ भोसले. फलटण पंचक्रोशीतच नव्हे, तर संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रात हे नाव आज खूप प्रसिद्ध आहे.सचिन भोसले यांच्या आयुष्याचा प्रवास खूप कष्टाचा आणि मेहनतीचा होता. पण, या खडतर प्रवासात ते थकले नाहीत, थांबले नाहीत, तर नव्या वाटा शोधून आपल्या कौशल्याने, आत्मविश्वासाने आणि दूरदृष्टीने या खडतर प्रवासाला सुखाच्या 'हाय-वे' मध्ये त्यांनी बदललं.

२००२साली सचिन यांनी पिठाची गिरणी सुरू केली आणि पुढच्याच वर्षी स्वतःचे किराणामालाचे छोटेसे दुकानही सुरू केले. त्यानंतर एकदा ते मुंबईला बहिणीकडे गेले होते. तिकडे असताना तिकडच्या मंडईमध्ये फिरताना त्यांना असे लक्षात आले की, मुंबईमध्ये भाजीपाल्याचे दर फलटणच्या तुलनेत अतिशय जास्त आहेत. यावरून सचिन यांची व्यावसायिक वृत्ती जागृत झाली आणि या व्यवसायामधील प्रचंड क्षमता पाहून, त्यांनी घरचा भाजीपाला व्यवसाय मुंबईमध्ये विस्तारायचे ठरवले. तेथील मार्केटचा अभ्यास करून फलटणवरून मुंबईत नेऊन भाजीपाला विक्रीचा व्यवसाय सुरू केला. तिथे सचिन यांचा चांगलाच जम बसला. भाजीपाला व्यवसायाच्या जोडीला २००७ साली त्यांनी दुधाचा व्यवसाय सुरू केला. त्यासाठी गोठा बांधला. पण, अजून काहीतरी नवीन आणि मोठे करण्याचे ध्येय त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते. यातूनच सचिन यांना एक नवीन व्यवसाय करायचे सुचले. सचिन यांना निसर्गाची आवड होतीच.या आवडीतूनच, त्यांच्या मुलीच्या जन्माच्या दिवशीच त्यांनी 'अष्टविनायक रोपवाटिका' नावाने रोपवाटिकेचा व्यवसाय सुरू केला.त्या एका छोट्याशा व्यवसायाचा विस्तार होत जाऊन सचिन यांच्या मालकीच्या आज तब्बल १३ नर्सरी आहेत. या नर्सरी सातारा, पुणे, सोलापूर जिल्ह्यांत वेगवेगळ्या ठिकाणी असून यामध्ये 'ऑरगॅनिक' भाजीपाला तयार करणाऱ्या नर्सरींचासुद्धा समावेश आहे.

त्यानंतर अंगभूत व्यावसायिक वृत्ती ठासून भरलेल्या सचिन भोसले यांचे लक्ष बांधकाम व्यवसायाकडे गेले. २०१०साली त्यांनी फलटणजवळ स्वतःसाठी नवीन फ्लॅट घेण्याचे ठरवले. जेव्हा ते फ्लॅट घेण्यासाठी बिल्डरकडे बुकिंगची रक्कम देण्यासाठी गेले, तेव्हा त्यांना समजले की, तो बिल्डर अशिक्षित आहे. त्या व्यक्तीला साधी सहीदेखील करता येत नाही. याचे कारण म्हणजे 'रिअल इस्टेट' क्षेत्रात शिक्षणापेक्षा 'ज्ञान' आणि 'भांडवल' हे अधिक महत्त्वाचे, हे सचिन यांच्या लक्षात आले. त्यांनी लगेच तो 'बुकिंग' केलेला फ्लॅट रद्द केला आणि परत आले. फलटणमध्ये त्यांनी त्यांचे चार मित्र, इंजिनिअर आणि सीए लोकांशी चर्चा केली. बांधकाम व्यवसायासंबंधित सर्व गोष्टींचा अभ्यास करून त्या चार मित्रांसोबत एक प्लॉट विकत घेऊन स्वतःच बांधकाम व्यवसायात ते उतरले. त्याच प्लॉटवर त्यांनी अपार्टमेंट बांधली आणि बांधकाम व्यवसायाचा श्रीगणेशा केला. यानंतर सचिन यांनी मागे वळून कधी पाहिलेच नाही. आजपर्यंत एकामागोमाग एक असे छोटे-मोठे तब्बल ३०बांधकाम प्रकल्प त्यांनी पूर्ण केले. हे प्रकल्प संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रात उभारले गेले.सचिन भोसले हे आज बांधकाम क्षेत्रातील सुप्रसिद्ध 'व्हिएनएस व्हिजन' ग्रुपचे अध्यक्ष आहेत. बांधकाम क्षेत्रामधील त्यांच्या भरीव कामगिरीबद्दल त्यांची 'मी मराठी' चॅनेलवर विशेष मुलाखतदेखील प्रसिद्ध झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्यावतीने सचिन यांना एका प्रकल्पासाठी पुरस्कारानेदेखील गौरविण्यात आले आहे.' प्रचंड आत्मविश्वास, नवीन काहीतरी करून दाखविण्याची धडाडी, जबरदस्त जिद्द, अभ्यासू वृत्ती आणि सतत नवनवीन करण्याचा ध्यास! हे सर्व गुण अंगात ठासून भरलेल्या सचिन भोसले यांना पुढील वाटचालीसाठी अनेकानेक शुभेच्छा...!



संकलन संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
इमेल -
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
गुरूवार १९ फेब्रुवारी २०२६



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## उरण मधे घाणीचे साम्राज्यःदलित-आदिवासी सफाई कामगारांचे आमरण उपोषण

पनवेल प्रतिनिधी-सुनील जाधव

उरण नगर परिषदेमधे अनेक वर्षांपासुंन कार्यरत असलेल्या दलित व आदिवासी कंत्राटी सफाई कामगांराच्या न्याय हक्कासाठी आमरण उपोषण सुरु केलेले असुन आमरण उपोषणाचा आज तिसरा दिवस सुरु असुन शहरा मधिल घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न गंभीर स्वरुपाचा बनला आहे. मे.समिक्षा वेस्ट मेनेजमेंट इन्फ्रा प्रा.लि.कंपनी आणी उरण नगर परिषद यांच्या मधे झालेल्या करारातील अटींचा सातत्याने भंग होत असल्याचा गंभीर आरोप आदोलंनकर्त्यांनी केला आहे.करारामधे नमुद असलेल्या कामगार



संख्येंत कपात करुन अधिक नफा मिळविण्याचा प्रयत्न केला जात असल्याने शहरात कच-याचे दररोज ढिग साचत आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.प्रशासनाकडुन मात्र कोणतीही ठोस कारवाई होताना दिसण्यांत येत नाही.यामुळे कामगांरानी उग्र आदोलंनाचा मार्ग स्वीकारला आहे.जो पर्यंत दलित-आदीवासी कत्रांटी कामगांराना न्याय मिळत नाही व करण्यांत आलेल्या कराराची तंतोतंत अमलंबजावणी होत नाही तो पर्यंत आमरण उपोषण मागे घेणार नाही असे आदोलंन कर्त्यांनी स्पष्टपणे नमुद केलेले आहे.

## मंडणगड पंचायत समितीचे वार्षिक स्नेहसंमेलनाचे निमीत्ताने (१९) रोजी डॉ. आंबेडकर सभागृहात विविध कार्यक्रम

मंडणगड प्रतिनिधी दि. २६- पंचायत समिती मंडणगड कला क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्यावतीने १९ फेब्रुवारी २०२६ रोजी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात शिवजंयत्ती व मंडणगड पंचायत समितीचे वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला आहे. या कार्यक्रमास ना. योगेश कदम, खासदार सुनील तटकरे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वैदेही रानडे, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी परिक्षीत यादव जिल्हा परिषद सदस्य प्रताप घोसाळकर, सौ. अस्मिती केंद्रे, पंचात समिती सदस्या सौ. प्रणाली चिले, सौ. दिप्ती घडशी, पंचायत समिती सदस्य अनिल रटाटे, दीपक मालुसरे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अभिषेक गावंडे, उपअभियंता कविता जवादे, उपअभियंता देवकीनंदन सकपाळे गटशिक्षण अधिकारी कल्याणी मुळे, पशुधन विकास अधिकारी संजिव अहिरे यांची मुख्य अतिथी म्हणून उपस्थिती लाभणार आहे. गटविकास अधिकारी सुनील खरात यांच्या मार्गदर्शनाखाली पंचायत समितीचे माध्यमातून सुरु असलेले विविध कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पवन गोसावी, राजेंद्र, रेवाळे, दिनेश जाधव, महेश वाघ, पुरुषोत्तम कर्वे, इस्माईल सय्यद, वामन मेंढे, शांताराम पवार, विशाल कदम, कुणाल जाधव, दिपाली दरिपकर, उदय गोसावी, प्रणिता बैकर, उमेदसिन वाघ, अहमद नाडकर यांची कार्यकारिणी कमिटी मेहनत घेत आहे. १९ फेब्रुवारी २०२६ रोज सकाळी १०.०० वाजता उद्घाटन सोहळा, ११.०० वाजता व्याख्यान, १२.०० आदर्श कर्मचारी पुरस्कार व बक्षीस वितरण, दुपारी २.०० वाजता स्नेहभोजन, ३.०० वाजता सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नागरीकांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन गटविकास अधिकारी सुनील खरात यांनी या निमीत्ताने केले आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल या केंद्रामध्ये एसएससी बोर्ड परीक्षाःसुयोग्य नियोजनातून यशाची हमी, तज्ञांचा विद्यार्थ्यांना मोलाचा सल्ला


महाराष्ट्रातील दहावीच्या एसएससी विद्यार्थ्यांची वार्षिक बोर्ड परीक्षा दिनांक २०/०२/२०२६ रोजी पासून सुरू होत आहे ही परीक्षा तोंडावर आली असून विद्यार्थ्यांना मध्ये परीक्षेची धाकधूक वाढली आहे ही धाकधूक कमी करण्यासाठी आणि उत्तम यश मिळवण्यासाठी डॉ.बी.ए.हायस्कूलचे मुख्याध्यापक आबासाहेब हुलगे, उपमुख्याध्यापक अर्जुन हुल्लोळी, पर्यवेक्षक शांताराम बैकर, शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी यांनी सुयोग्य एसएससी बोर्ड परीक्षेचे नियोजन केंद्र क्र.७००२ डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल मंडणगड येथे करण्यात आले आहे.


त्यासाठी प्रत्येक शाळेमध्ये देशाचे पंतप्रधान यांचे परीक्षा पे चर्चा कार्यक्रम, तणाव मुक्त समुपदेशन, कॉपीमुक्त अभियान असे विविध उपक्रम राबविण्यात आले या केंद्रावर एकूण २७६ विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत ही परीक्षा दिनांक २०/०२/२०२६ ते १८/०३/२०२६ पर्यंत होणार आहे.त्यामध्ये डॉ.बी.ए.हायस्कूल मंडणगड,राजीव गांधी इंग्लिश मीडियम स्कूल मंडणगड, पणदेरी हायस्कूल, महाप्रळ हायस्कूल, सोवेली हायस्कूल, नॅशनल हायस्कूल, केशव शेठ लेंडे हायस्कूल, तुळशी हायस्कूल, आंबडवे हायस्कूल या हायस्कूलचे विद्यार्थी या केंद्रावर परीक्षेसाठी येणार आहेत. परीक्षा सुरू होण्याअगोदर परीक्षा केंद्रावर भौतिक सुविधा, सीसीटीव्ही कॅमेरे, बैठक व्यवस्था, नियुक्त घटकांची सभा अशा सुव्यवस्थित विविध गोष्टींमधून परीक्षा केंद्र संचालक श्री विजय खाडे, उपकेंद्र संचालक शांताराम बैकर, स्टेशनरी प्रमुख चिंतामणी पिंगळा, लेखनिक बजरंग गावडे यांनी परीक्षा पूर्वतयारी उत्तमरीत्या केलेले आहे त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढून आनंददाही वातावरण निर्माण झाले आहे.



## इतिहासाची पुनरावृत्ती पुन्हा कोकण विभागातून प्रथम क्रमांक! महाराष्ट्र शासन पुरस्कृत माझी वसुंधरा अभियान ५.०

दापोली,(प्रतिनिधी): गेल्या वर्षी माझी वसुंधरा अभियान ४.० चा निकाल जाहीर झाला तेव्हा संपूर्ण कोकण विभागातील (रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, ठाणे, पालघर) पाच जिल्ह्यांमधून ग्रामपंचायत विरसई हिने प्रथम क्रमांक पटकावत मानाचा (₹५० लाख) पुरस्कार मिळवला होता.ङ्ङआज पुन्हा एकदा इतिहासाची पुनरावृत्ती झाली आहे! माझी वसुंधरा अभियान ५.० चा निकाल जाहीर झाला असून ग्रामपंचायत विरसईने पुन्हा कोकण विभागातून प्रथम क्रमांक पटकावला आहे.ङ्ङया यशामध्ये सरपंच मनोरमा राणे, उपसरपंच विद्यार्थी जाधव, ग्रामविकास अधिकारी विरेश कदम, मार्गदर्शक दिनेश राणे, ग्रामपंचायत सदस्य-सदस्या व कर्मचारीवर्ग यांचे मोलाचे योगदान आहे. तसेच विरसई जनसेवा मंडळ (मुंबई/ग्रामीण) चे सर्व पदाधिकारी, विरसई जनसेवा महिला मंडळ चे पदाधिकारी, विरेश्वर विद्यालय विरसई येथील विद्यार्थी-शिक्षक व कर्मचारीवर्ग, जि.प. आदर्श मराठी शाळेतील विद्यार्थी-शिक्षक, अंगणवाडी सेविका-मदतनीस तसेच आदर्श गाव विरसईतील लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्व ग्रामस्थांचे हे एकत्रित यश आहे.ङ्ङपर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि शाश्वत विकासाच्या दिशेने विरसई गावाने उभा केलेला आदर्श संपूर्ण कोकणासाठी प्रेरणादायी आहे.



विभागस्तर :

| अ.क्र. | विभाग | स्थानिक संस्थेचे नांव | बक्षिसाची रक्कम |
| --- | --- | --- | --- |
| १ | कोकण | विरसई ग्रामपंचायत | रु. ५०.०० लक्ष (रु. पन्नास लक्ष फक्त) |
| २ | पुणे | समर्थगाव ग्रामपंचायत | रु. ५०.०० लक्ष (रु. पन्नास लक्ष फक्त) |
| ३ | नाशिक | जाफराबाद ग्रामपंचायत | रु. ५०.०० लक्ष (रु. पन्नास लक्ष फक्त) |
| ४ | छत्रपती संभाजी नगर | कोल्हावाडी ग्रामपंचायत | रु. ५०.०० लक्ष (रु. पन्नास लक्ष फक्त) |
| ५ | अमरावती | राजनखेड ग्रामपंचायत | रु. ५०.०० लक्ष (रु. पन्नास लक्ष फक्त) |
| ६ | नागपूर | मिर्झापूर ग्रामपंचायत | रु. ५०.०० लक्ष (रु. पन्नास लक्ष फक्त) |
| | | एकूण | रु. ३.०० कोटी (रु. तीन कोटी फक्त) |

SHAHEEN SWALI SHAIKH
(शाहीन शेख)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन
36

## माजी विद्यार्थ्यांनी दिली शाळेच्या नवीन इमारत बांधकामासाठी एक लाखांची देणगी

उपसंपादक प्रदीप पवार

मोहन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, आकले येथील सन १९९८ -९९ च्या दहावीच्या बॅचमधील माजी विद्यार्थ्यांनी आपल्या मातृसंस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त करत




शाळेच्या नवीन इमारत बांधकामासाठी एक लाख रुपये इतकी आर्थिक देणगी दिली. ही देणगी माजी विद्यार्थी स्नेहसंमेलनाच्या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष बळीराम तानाजीराव शिंदे व शाळेचे मुख्याध्यापक संजय वाघमारे यांच्याकडे सुपूर्त करण्यात आली. या कार्यक्रमासाठी उपस्थितांमध्ये अभिमानाची भावना दिसून आली. या कार्यक्रमात दहावी बॅचमधील माजी विद्यार्थी समाजसेवक विनेश मोहिते, सैनिक इकबाल चिपळूणकर, डॉ. अभिजीत दुधाळ, डॉ. राजेंद्र राऊत, प्रतीक्षा शिंदे, सचिन पवार, सतीश सकपाळ, दर्शन मोरे, रुपेश साळुंखे, प्रमोद मोरे, संतोष जाधव आदी सहभागी झाले होते. तसेच सदर कार्यक्रमासाठी विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक दिगंबर गवस सर, रघुनाथ जाधव सर, नीता साळवी मॅडम उपस्थित होत्या. नवीन इमारत बांधकामासाठी दिगंबर गवस सर यांनी दहा हजार रुपयाची रोख देणगी दिली तर निता साळवी मॅडम यांनी ५० गोणी सिमेंट देणगी स्वरूपात दिले. तसेच माजी विद्यार्थिनी प्रतीक्षा बळीरामराव शिंदे व संतोष जाधव या माजी विद्यार्थ्यांनी वैयक्तिक स्वरूपात प्रत्येकी दहा दहा हजार रुपये देणगी दिली. कार्यक्रमासाठी न्यू इंग्लिश स्कूल तिवरेचे सहाय्यक शिक्षक नाझरे सर, आणि आकले विद्यालयाचे सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. माजी विद्यार्थ्यांनी व सेवानिवृत्त शिक्षकांनी दिलेल्या या योगदानामुळे शाळेच्या विकास कार्याला निश्चितच चालना मिळणार असून त्यांच्या या सामाजिक बांधिलकीचे शैक्षणिक क्षेत्रातून व समाजातून कौतुक होत आहे.

## मुंडे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतला सहलीचा आनंद

मंडणगड (प्रतिनिधी)

:येथील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील




भौतिकशास्त्र विभाग व रसायनशास्त्र विभागाच्या वतीने नुकतेच अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये राजस्थानमधील जयपूर व उदयपूर या परिसरात अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या सहलीचा आंनद घेतला, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मिक परहर व उपप्राचार्य डॉ. विष्णु जायभाये यांच्या योग्य मार्गदर्शनाखाली या विभागाच्या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये डॉ. मुकेश कदम व प्रा. संदीप निर्वाण हे सहभागी झाले होते. तर डॉ. सूरज बुलाखे व प्रा. शरीफ काझी यांचे सहकार्य लाभले. यावेळी विद्यार्थ्यांनी अल्बर्ट वस्तूसंग्रहालय,जंतर-मंतर, अमेर किल्ला, सिटी पॅलेस, हिंदूस्थान झिंग, हवामहल, जलमहल,राजस्थान विद्यापीठ जयपूर इत्यादी ठिकाणी भेट देवून माहिती घेतली. ङ्ग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना चार भिंतीच्या बाहेरचे जग, निसर्ग, गड, किल्ले कारखाने, सहकार क्षेत्र, शैक्षणिक संकूल अशा ठिकाणची माहिती विद्यार्थ्यांना जाणून घेण्याची आवड निर्माण व्हावी, अशा प्रकारच्या भेटीमधून त्यांच्यामध्ये प्रेरणा निर्माण व्हावी या उद्देशाने सदर अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मिक परहर यांनी दिली.

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )